TRIMURTI EDUCATION SOCIETY'S VIMALBAI UTTAMRAO PATIL ARTS LATE DR. B. S. DESALE SCIENCE COLLEGE SAKRI, MAHARASHTRA

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री ता. साक्री जि. धुळे महाराष्ट्र

त्रिमूर्ती शिक्षण संस्था, साक्री जि. धुळे
साक्री
स्थापना १९९८

नॅक प्रमाणित

Principal- Dr. P. S. Sonawane
M.A, Ph.D
Mobile No.-7588318995

Email id-
vimalbaipatilcollege@gmail.com

## पर्यावरण शास्त्र विषयाचा प्रकल्प अहवाल २०२०-२१

महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र या प्रथम वर्ष कला व विज्ञान या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा असणाऱ्या अभ्यासक्रमात अभ्यासक्रमास २० मार्क साठी प्रोजेक्ट वर्क आहे. गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवावरून व कोरोना आपत्तीच्या प्रभावा वरून तसेच पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पेपरलेस व शाश्वत असा प्रकल्प विद्यार्थ्यांकडून तयार केला जावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक वर्ष 2020-21. या कालावधी पासून महाविद्यालयातील प्राचार्य डॉ पी एस सोनवणे यांच्या परवानगीने भूगोल विभागात सीड बँक तयार करून प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्याही प्रकारच्या झाडाच्या किमान २0 बिया या बँकेत जमा करण्या विषयी धोरण निश्चित करण्यात आले. खर म्हणजे हे शैक्षणिक वर्ष आज पर्यंतच्या इतिहासात अतिशय संकटाचे वर्ष म्हणून ओळखले जाईल. मात्र शिक्षणाचे नवनवीन तंत्र या आपत्ती विकसित झाले. हाच एक भाग म्हणून ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेत पर्यावरणाच्या समतोला विषयी खूप काही बदल पाहायला मिळालेत. या आपतीचा अनुकूल परिणाम फक्त पर्यावरणाच्या दृष्टीने झाला. हाच बदल पाहून मा प्राचार्यांना व्हॉटसयॉप वरून संदेश पाठवला होता व माझी सीड बँक निर्माण करण्याची कल्पना त्यांना सांगितली व त्यांनि याविषयी फोनेवर सविस्तर चर्चा केली व अतिशय छान कल्पना म्हणून कौतुक केले. मग विद्यार्थ्यांना व्हॉटसयॉप ग्रुप वर बिया गोळा करण्याविषयी संदेश पाठवला मात्र कोरोना आपत्तीचा प्रभाव लक्षात घेता नियमांचा वापर करून बिया गोळा करण्याविषयी कल्पना दिली व कोणत्याही प्रकारचे सक्ती न करता स्वेच्छेने बिया जमा करण्या

विषयी आव्हान केले होते. विद्यार्थ्यांनीही या प्रकल्पाला छान असा प्रतिसाद दिला. कोणत्याही प्रकारची सक्ती नसताना खूपच छान प्रतिसाद दिला. आमच्या या सीड बँकेत २००० बिया जमा झाले, जमा झालेल्या बिया, जून महिन्यात बियांचे रोपण डोंगर परिसंस्थेत रुजवण्यासाठी आजी-माजी विद्यार्थ्यांचे व पर्यावरण मित्रांचे सहकार्य घेण्याविषयीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.. शंभर टक्के प्रामाणिक हेतूने हा प्रकल्प राबवला जात आहे. हा प्रकल्प इतर महाविद्यालयात मॉडेल प्रोजेक्ट म्हणून पाहिला जावा या हेतूने आमच्या पर्यावरण विभागाच्या वतीने कार्य सुरू आहे. निश्चितच हा प्रकल्प शास्वत प्रकल्प म्हणून विकसित व्हावा असा आमचा उद्देश आहे आणि त्या हेतूने आमच्या पर्यावरण विभागाच्या वतीने प्रयत्न सुरू आहेत.

तरुण भारत

Main Edition | 2021-07-17 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

## गाव शिवार वार्ता...

# साक्री महाविद्यालयाची बीज संकलन मोहीम प्राचार्यांकडे हस्तांतरित; बीज बँकेचे सर्वत्र कौतुक



**नवापूर** : श्रीमती विमलताई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. वी.एस देसले विज्ञान महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र अभ्यास विभागाच्यावतीने गेल्या दोन वर्षापासून बीज बँकेची स्थापना करण्यात आली आहे या बँकेसाठी प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी बीज गुणांचा प्रकल्प अहवाल सक्तीचा आहे यासाठी आमच्या महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विभागाचे समन्वयक प्रा. ए.पी. नांद्रे यांनी अहवाला ऐवजी एका विद्यार्थ्याने कोणत्याही झाडाच्या कमीत कमी २० बिया बँकेसाठी दान द्यायचे असे धोरण निश्चित झाले आहे त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी मोठा प्रतिसाद दिला व बीच बँकेत विविध प्रकारच्या बियांचे संकलन झाले यात साक्री तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून सिताफळ, रामफळ, लिंब व जांभूळ च्या बियांचा पुरवठा झाला तर सातपुडा पर्वत रांगेतील नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांकडून शिवम, इंग्रजी चिंच, काशीद इत्यादी बियाण्यांचा पुरवठा झाला. मालपुर येथील रामनगर येथील वस्तीजवळ असणारा डोंगर निसर्ग मित्र समिती साक्री यांनी दत्तक घेतला आहे. पर्यावरण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत या डोंगरावर बियांचे रोपण वेळोवेळी केले जाते व आताही संकलित झालेले बियांचे रोपण येथे केले जाणार आहे, असे मा. प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे यांनी जाहीर केले या बियांची हस्तांतरण मा. प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांच्याकडे पर्यावरण विभाग प्रमुख प्रा. ए.पी. नांद्रे यांच्यावतीने करण्यात आले याप्रसंगी डॉ. झे. झेड. साळुंके डॉ. डी डी माळी प्रा. ए. एन. भदाणे शिक्षकेत्तर कर्मचारी डी.जे. पाटील हेमंत तोरवणे, जितेंद्र काकुस्ते हे उपस्थित होते.

# महाविद्‌यालयात आजी विध्यार्थ्यानी केले बीज संकलन तर माजी विध्यार्थ्यानी केले डोंगरावर बीजारोपण २०२०-२१

तरुण भारत

## महाविद्यालयात आजी विद्यार्थ्यांनी के
## कलन तर माजी विद्यार्थ्यांनी केले रोप
### लबाई पाटील महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

